# पुणे महानगरपालिका
## * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक ५४

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १९/३/२०१९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र. २८९८**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४ कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर–मुंढवा, वानवडी–रामटेकडी व कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयांकडील दि. १/२/२०१९ ते दि.२८/२/२०१९ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४ यांचे जा.क्र. समआ–४/६०३६ दि.८/३/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २८९९**

पुणे महानगरपालिका क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त क्षेत्रिय कार्यालयांच्या माहे फेब्रुवारी २०१९ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/क्षेआप२/१६५१ दि.११/२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २९००**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ चा माहे फेब्रुवारी २०१९ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांचे जा.क्र. उप–१/७६७८ दि.१२/३/२०१९ चे पत्र.

### माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. २९०१**

क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरुड–बावधन क्षेत्रिय कार्यालयांकडील दि.१/२/२०१९ ते २८/२/२०१९ अखेर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/क्षेआप/२/१६५२ दि.११/३/२०१९ चे पत्र.

### हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. २९०२**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील पेठ वारजे सन २००९–२०१० मधील आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२८३७ दि.७/३/२०१९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. २७ सन २०१८–२०१९ चा विचारासाठी.

### सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. २९०३**

पुणे महानगरपालिकेचे सुरक्षा अधिकारी (वर्ग–२) श्री.संतोष संभाजीराव पवार (प्रभारी मुख्य सुरक्षा अधिकारी) यांची निलंबन कालावधीची दि.४/६/२०१८ पासून दि.३/१२/२०१८ पर्यंतची तिसरी सहामाही पूर्ण झाली असून ममहानगरपालिका सेवा विनियम मधील प्रकरण ६ वे क्र.५८ नुसार सदर बाब निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/साप्र/१६५३ दि. १४/३/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २९०४**

पुणे महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागातील श्री.रमेश वामनराव शेलार, मुख्य सुरक्षा अधिकारी (वर्ग–१) यांची आठवी सहामाही दि.२३/८/२०१८ पासून दि.२२/२/२०१९ रोजी पूर्ण झाली असून सदर पूर्ण सहामाही ममहानगरपालिका सेवाविनियम मधील प्रकरण ६ वे क्र.५८ नुसार सदर बाब निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/साप्र/१६५४ दि. १४/३/२०१९ चे पत्र.

**सर्वात कमी रकमेचे टेंडर्स**

**विषय क्र. २९०५**

पुणे महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये विद्युत विषयक उर्वरित कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मोरेश्वर इलेक्ट्रीकल कॉर्पोरेशन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु. ८९,२६,१३६/– पेक्षा १.८६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८७,६०,१०९=८७ अधिक जी.एस.टी. १२% र.रुपये १०,५१,२१३=१८ असे एकूण र.रुपये ९८,११,३२३=०५ जीएसटीसह पर्यंत काम करुन घेणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१६४७ दि.८/३/२०१९ चे पत्र.
(टिप :– प्रस्तुत कामी निविदा र.रु. ९८,११,३२३=०५ इतकी असताना चालू आर्थिक वर्षात कमी म्हणजे फक्त र.रु.५०,००,०००/– इतकी तरतुद उपलब्ध आहे. या बाबीचा विचार करता सदर काम पुर्ण करण्यासाठी उर्वरित आवश्यक तरतुद सन २०१९–२० हया आर्थिक वर्षात उपलब्ध करुन देणेची संपुर्ण जबाबदारी संबंधीत खातेप्रमुखाची राहील.)

**विषय क्र. २९०६**

प्रभाग क्र. २६ ड हडपसर स.नं. ४८ येथे नव्याने गार्डन विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अनिकेत ॲग्रो सर्व्हिसेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ७१,६९,७००/– पेक्षा ७.२१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६६,५२,७६४=६३ अधिक जी.एस.टी. र.रुपये ८,६०,३६४/– उपलब्ध रकमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१६४८ दि.८/३/२०१९ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**